File No.SMC-11011(21)/89/2022-SMC-GAD

# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.

जाहीर प्रसिध्दीकरण

**सामान्य प्रशासन विभाग**

जा.क्र.सआस/कक्ष-1/आस्था-1/45
सामान्य प्रशासन विभाग,
सोलापूर. दि. 27 /04/2022.

सोलापूर महानगरपालिका, परिवहन उपक्रमाकडील उप-परिवहन व्यवस्थापक या पदावर खालीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांकडून अथवा सेवानिवृत्त अधिकाऱ्यांमधून थेट मुलाखतीद्वारे निवड करण्यात येणार आहे.

पदनाम :- उप-परिवहन व्यवस्थापक

शैक्षणिक अर्हता :- ग्रॅज्युएट एन ऑटोमोबाईल इंजिनिअरींग पदवी व

10 वर्षे ऑटोमोबाईल क्षेत्रातील कामाचा अनुभव

तरी उपरोक्त प्रमाणे शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांनी दि. 05 /04/2022 रोजी सकाळी ठिक 10.30 वा. आपल्या संपूर्ण माहिती व मुळ कागदपत्रांसह उपस्थित रहावयाचे आहे. तसेच मुलाखत ही त्याच दिवशी दुपारी 12.30 पासून घेण्यात येईल.

सदर पदासाठी आवश्यक असणाऱ्या अटी व शर्ती तसेच मानधनाबाबतची माहिती ही www.solapurcorporation.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

अर्जाचा नमुना सोलापूर महानगरपालिकेच्या www.solapurcorporation.com या संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घ्यावा.

(पि.शिवशंकर, भा.प्र.से.)
**आयुक्त,**
सोलापूर महानगरपालिका

Signed by P.sivasankar
Date: 26-04-2022 14:45:03
Reason: Approved

**File No.SMC-11011(21)/89/2022-SMC-GAD**

<u>सोलापूर महानगरपालिका</u>

**संदर्भ :-** <u>उप-परिवहन व्यवस्थापक पदासाठीचे जाहीर प्रसिध्दीकरण</u>

संदर्भीय पदासाठी देण्यात आलेल्या जाहीर प्रसिध्दीकरणास अनुसरुन परिवहन उपक्रमाकडील उप-परिवहन व्यवस्थापक या पदासाठी सेवानिवृत्त अथवा अहर्ता प्राप्त उमेदवारांकडून तात्पुरत्या कालावधीसाठी मानधनावर नियुक्ती करावयाच्या पदासाठी आवश्यक अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील.

1. मानधन : सदरची नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपात सहा महिने कालावधीकरीता एकवट मानधन र.रु.30,000/- वर पूर्णवेळ कामकाजासाठी राहील.
2. निवड प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर स्थगित करणे / बदल करणे याबाबतचे अधिकार आयुक्त, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांना राहतील याबाबत कोणताही वाद न्यायालयात किंवा इतर लवादासमोर उपस्थित करता येणार नाही.
3. उमेदवार काम करण्यास सक्षम असलेबाबत वैद्यकीय दाखला अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.
4. अर्जासोबत आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्राच्या मुळ प्रति तसेच छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.
5. अर्जासोबत उमेदवाराने अलीकडील काळात काढलेले पासपोर्ट साईजचे दोन फोटो जोडणे आवश्यक आहे.
6. पद भरती प्रक्रिया अत्यंत तर्क शुध्द व पारदर्शक पध्दतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने कोणीही कोणत्याही प्रलोभनास बळी पडू नये.
7. पात्रता, अर्जाची स्विकृती किंवा नाकारणे, चुकीची माहिती दिल्याबद्दलची कारवाई व निवड पध्दती याबाबत मा.आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील.
8. नियुक्तीच्या कालावधीमध्ये उमेदवाराकडून कोणत्याही स्वरुपाचे गैरवर्तन केल्याचे आढळून आल्यास नियुक्ती रद्द करण्यात येईल, त्यासाठी नियुक्ती पत्रातील कालावधी बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.
9. उमेदवारांना नियमित शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे अन्य कोणतेही लाभ, सेवेत समावेश, वेतनश्रेणी व इतर लाभ अनुज्ञेय असणार नाहीत.
10. नियुक्ती कालावधीमध्ये काम समाधानकारक नसलेचे आढळून आल्यास संबंधितास कोणतीही पूर्व सूचना न देता कमी करण्यात येईल. याबाबत कोणताही वाद कोणत्याही न्यायालयात सादर करता येणार नाही.
11. नियुक्तीपूर्वी उपरोक्त प्रमाणे सर्व शर्ती व अटी मान्यत असलेबाबतचे करारपत्र विहित स्टॅम्प पेपरवर तयार करुन देणे बंधनकारक राहील.

(पि.शिवशंकर, भा.प्र.से.)
**आयुक्त,**
<u>सोलापूर महानगरपालिका</u>